सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक.H.D.21019/28/2026-POL5B-MHD/1672322,दि. २५/०५/२०२६

**विषय:-** राज्य पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवापुस्तकामधील (Service Book) नोंदविलेल्या तपशीलाची तपासणी करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक.H.D.21019/28/2026-POL5B-MHD/1672322,दि. २५/०५/२०२६ सोबत महाराष्ट्र शासन, गृह विभाग, ची प्रत सहपत्रांसह आवश्यक त्या कार्यवाही साठी जोडली आहे.

Digitally signed by
Chandrashekhar Govindrao Shinde
Date: 01-06-2026 14:49:41

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र १ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

`

राज्य पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवापुस्तकामधील (Service Book)नोंदविलेलया तपशीलाची तपासणी करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

परिपत्रक क्र. – **H.D.-21019/28/2026-POL5B-MHD/ 1672322**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २५ मे, २०२६

## प रि प त्र क

राज्य पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवापुस्तकातील (Service Book) अचूक नोंदी हा त्यांच्या सेवाकाळातील अत्यंत महत्वाचा दस्तऐवज आहे. निवृत्तीवेतन, पदोन्नती आणि इतर सेवाविषयक लाभांसाठी सेवापुस्तकातील नाव, जात व जन्मदिनांक अचूक असणे आवश्यक आहे. अनेकदा सेवापुस्तकात नाव, जात व जन्मदिनांकाच्या नोंदीमध्ये केवळ लेखनदोषांमुळे चुका झालेल्या असतात.

अधिकारी/कर्मचारी यांच्या जन्मदिनांकात दुरुस्ती करण्याबाबत, शासकीय नियमानुसार, ठराविक कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. अनेक अधिकारी/कर्मचारी हे सेवानिवृत्ती जवळ येईपर्यंत या चुकांबाबत अनभिज्ञ असल्याने, अगदी ऐन सेवानिवृत्तीच्या उंबरठयावर दुरुस्तीचे अर्ज शासनाकडे सादर केले जातात. विहीत मुदतीनंतर आणि अपुऱ्या पुराव्यांसह सादर केलेल्या अशा अर्जांवर शासन स्तरावर त्वरीत निर्णय करणे शक्य होत नाही.

याबाबत पोलीस दलातील सर्व घटक प्रमुखांना (पोलीस महासंचालक/पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक/समादेशक) असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवापुस्तकांची पडताळणी करावी आणि खालीलप्रमाणे कार्यवाही करावी -

i. जन्मदिनांकात दुरुस्ती करण्याच्या प्रस्तावांबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ (दि.३०.१२.२०२१ पर्यंत सुधारीत) नियम ३८ च्या तरतूदींनुसार, सर्व प्रकरणांची आगाऊ पडताळणी होईल, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

ii. उक्त नियमातील नियम क्र.४५ नुसार सेवा पुस्तकांची व सेवा पटांची वार्षिक पडताळणी व नियम क्र.४६ नुसार पोलीस शिपायांचे सेवापट सुस्थितीत ठेवावी.

iii. प्रत्येक पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्याला त्याचे सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठावरील सर्व नोंदींची तपासणी करून ती सत्य असल्याचे खालीलप्रमाणे प्रमाणित करून घ्यावे -

Scanned with CamScanner

"माझ्या सेवापुस्तकातील नाव, जात व जन्मदिनांक मी स्वतः तपासली असून, ती संपूर्णपणे बरोबर आणि अचूक आहे" हा शेरा लिहून त्यावर कर्मचाऱ्याची स्वाक्षरी, पदनाम आणि दिनांक नोंदविण्यात यावा.

iv. अधिकारी/कर्मचाऱ्यांने सेवापुस्तकातील नोंदी बरोबर असल्याचे प्रमाणित केल्यानंतर कालांतराने त्यात दुरुस्ती करण्याची कोणतीही विनंती मान्य केली जाणार नाही, याची जाणीव करून देण्यात यावी.

v. सदर तपासणी दरम्यान, एखाद्या कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकातील नोंदीबाबत तफावत/चूक आढळल्यास, त्याबाबत शासनाच्या विहीत तरतूदीनुसार संबंधित आस्थापना विभागाकडे अर्ज सादर करण्यात यावा.

vi. सेवापुस्तकातील सर्व बाबींची पूर्तता करून घेण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील.

(रविंद्र पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
३) सर्व पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य.
४) सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.
५) निवडनस्ती पोल-५ब

} पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांच्यामार्फत

Scanned with CamScanner